HGH INDIA 2018 SM
HOME DECOR ▪▪▪ GIFTS ▪▪▪ HOUSEWARE
JULY 3-5, 2018 MUMBAI, INDIA
NEWS 1
A TEXZONE Event
Where business feels at home!

# अधिक मोठे, अधिक ठळक ७वे संस्करण

एचजीएच इंडियाची ७वी आवृत्ती ४७५ पेक्षाही अधिक महानगरांतील आणि शहरांतील ट्रेड व्हिजिटर्सचे स्वागत करण्यासाठी सज्ज झालेली आहे.

व्यापार आणि संस्थात्मक खरेदीदार नवनवीन कल्पना पाहू शकतात आणि त्यांचे मूल्यमापन करू शकतात आणि ३० देशांमधील ५५० ब्रँड्स आणि निर्मात्यांनी प्रदर्शनात मांडलेले होम टेक्स्टाईल्स, होम डेकोर, हाऊसवेयर आणि गिफ्ट प्रॉडक्ट्स यांचे नवीन कलेक्शन पाहू शकतात. पहिल्यांदाच एचजीएच इंडिया तीन स्वतंत्र हॉल्समध्ये हे प्रदर्शन मांडील, ज्यातील प्रत्येकात होम टेक्स्टाईल्स (हॉल १), होम डेकोर आणि गिफ्ट्स (हॉल २) आणि हाऊसवेयर आणि गिफ्ट्स (हॉल ३) यांची विशिष्ट वर्गवारी असेल.

भारतातील आणि इतर देशांमधील ८०पेक्षाही अधिक नवे प्रदर्शक बेड लिनन आणि डेकोरेटिव्ह बेडिंग्ज, टॉवेल्स आणि बाथ लिनन, मॅट्रेसेस, फर्निशिंग फॅब्रिक्स, कर्टन्स, ब्लाईंड्स, डेकोरेटिव्ह मेड-अप्स, रग्ज आणि कार्पेट्स, व्हिनाईल आणि वूडन फ्लोअरिंग, वॉलपेपर्स, हँडिक्राफ्ट्स, डेकोरेटिव्ह ॲक्सेसरीज, कूकवेयर, किचनवेयर, किचन अप्लायन्सेस, टेबलवेयर, ग्लासवेयर, डेकोरेटिव्ह ग्लास, स्टोअरेज, प्लॅस्टिकवेयर आणि जनरल हाऊसवेयर यांसारख्या संवर्गातील उत्पादनांसह यात सहभागी होतील. ते ट्रेड व्हिजिटर्ससाठी नवीन आणि अधिक विस्तृत सोर्सिंगचे पर्याय निर्माण करतील. बर्गहॉफ (बेल्जिअम), आरसीआर (इटली), इंटर डिझाईन (यूएसए), कोर्कमाझ (तुर्की), ऑंकू (तुर्की), स्पेस टेक्नॉलॉजिज् (कोरिया), मोन्नो सिरॅमिक्स (बांग्लादेश), आयदिन (तुर्की), डेकोर कॅम (तुर्की), लेई मिंग (तैवान), हँगझू जिडा (चीन) आणि रॅको (श्रीलंका) हे काही अग्रगण्य आंतरराष्ट्रीय ब्रँड्सपैकी काही आहेत, जे पहिल्यांदाच प्रदर्शनात सहभागी होतील.

नेहमीच्या प्रदर्शकांमध्ये स्पेसेस, बॉंबे डाईंग, ट्रायडंट, इंडो काउंट, मॅस्पर, ॲना सिमोना, बोरोसिल, पेप्स, स्प्रिंगफिट, डिसिटेक्स, जीएम फॅब्रिक्स, एफ ॲंड एफ, केसी फॅब्रिक्स, डेको विंडो, नेचर्स मेनिया, क्ले क्राफ्ट, फ्रीलान्स यांच्यासारखे अग्रगण्य ब्रँड्स २०१८-१९च्या किरकोळ हंगामासाठी त्यांची नवकल्पनायुक्त उत्पादने आणि उत्पादनांची नवी मालिका बाजारात आणण्यासाठी सज्ज होत आहेत.



*एचजीएच इंडिया २०१७ मधील हॉल १चे दृश्य*

**सध्याच्या ऑनलाईन नोंदणीचा कल बघता, एचजीएच इंडिया २०१८ ट्रेड व्हिजिटर्सची संख्या अजूनही वाढण्याची शक्यता आहे**

एचजीएच इंडियाने उपलब्ध करून दिलेली घरगुती बाजारपेठेतील मोठ्या संधीचा अंदाज घेत ईपीसीएचसारख्या (एक्सपोर्ट प्रमोशन काऊन्सिल फॉर हँडिक्राफ्ट्स); एआयडब्ल्यूए (ऑल इंडिया वॉलपेपर्स कव्हरिंग असोसिएशन); एचएमसीएम (हँडिक्राफ्ट मेगा क्लस्टर मिशन); ईव्हीएसआयडी (टर्किश हाऊसवेयर मॅन्युफॅक्चरर्स ॲंड एक्सपोर्टर्स असोसिएशन); गोल्डन सील (तैवान); एचकेटीडीसी (हॉंग कॉंग ट्रेड डेव्हलपमेंट काऊन्सिल) झेजियांग ब्रॉड इंटरनॅशनल (चीन) यांच्यासारख्या अग्रगण्य संस्था त्यांच्या सभासदांचा सामूहिक सहभाग आयोजित करीत आहेत.


एचजीएच इंडियाची सुरुवात झाल्यापासून फॅशन ट्रेंड्सचे भाकीत करणे हा त्यांचा महत्त्वाचा पैलू आहे. थीम ट्रान्झिशनच्या अंतर्गत सादर केलेले, २०१८-१९ साठीचे ट्रेंड्स अधिक मोठ्या ट्रेंड्स पॅव्हेलिअनमध्ये हॉल क्र. १च्या शेवटाकडे सादर केले जातील. ह्या वर्षीचे ट्रेंड्स चार सब-थीम्समध्ये विभागले गेले आहेत, ते म्हणजे #सो.फंकी ॲट होम; #सॉफ्ट शेड्स ऑफ नेचर; #कलेक्टर्स चेंबर आणि #स्मार्ट बोहेमियन्स.

ट्रेंड्स पॅव्हेलिअनमध्ये व्हिजिटर्स २०१८-१९ साठी रंग, डिझाईन, मटेरिअल्स आणि स्टाईल्स तर शोधून काढतीलच, पण ह्या ट्रेंड्सवर आधारित खरोखरची उत्पादनांचेही प्रदर्शन करतील, जी ते एचजीएच इंडिया २०१८मधील विविध प्रदर्शकांकडून त्यांच्या स्टोअर्ससाठी सोर्स करू शकतील.


किरकोळ व्यापारी, घाऊक व्यापारी, वितरक, आयात करणारे, संस्थात्मक खरेदीदार आणि डिझायनर्सनी एक परिणामकारक व्यासपीठ म्हणून स्वीकार केलेले एचजीएच इंडिया २०१८ मध्ये पुन्हा एकदा व्हिजिटर्सनी स्वारस्य दाखवलेले आहे. व्हिजिटर्सच्या आगाऊ नोंदणीने आधीच सर्वोच्च संख्या पार केलेली आहे. अजूनही १५ तारखेपर्यंत नोंदणी चालू आहे. सध्याचा कल पाहता, एचजीएच इंडिया २०१८ गेल्या वर्षीच्या ३०,७०० ह्या संख्येपेक्षा अजून मोठी संख्या नोंदवण्याची शक्यता आहे.

# वर्षानुवर्षे सातत्यपूर्ण वाढ


प्रदर्शकांमध्ये वाढ





व्हिजिटर्सच्या संख्येतील वाढ




व्हिजिटर्स (बिझिनेस प्रोफाईल)




व्हिजिटर्स (जॉब प्रोफाईल)




एक उत्तम ट्रेड शो येऊ घातलेल्या संधी, उत्पादने आणि बाजारपेठेतील व्यवसायाचे कल यांचे खरे प्रतिबिंब प्रदान करतो. यातूनच बोध घेऊन एचजीएच इंडियाने भारतीय बाजारपेठांसाठी एक यशस्वी ट्रेड शो विकसित केलेला आहे, ज्यात प्रोफेशनल व्हिजिटर्सना आणि प्रदर्शकांना वर्षानुवर्षे कधीही न संपणारी उत्कंठा उपलब्ध करून दिली जाते.

सहा प्रशंसाप्राप्त वार्षिक आवृत्त्यांचा अनुभव पाठीशी असलेल्या एचजीएच इंडियाने अशा प्रकारच्या संवर्गात भारतीय अग्रगण्य ट्रेड शो म्हणून आपले स्थान अधिक मजबूत केलेले आहे. हा एक व्यावसायिक, ट्रेंड सेटिंग ट्रेड शो आहे, जो त्यातील प्रदर्शकांना भारतीय किरकोळ व्यापारी, वितरक, ट्रेड बायर्स, इंटेरिअर डिझायनर्स यांच्यासाठी तयार केलेला ट्रेड शो आहे. प्रदर्शकांची आणि ट्रेड व्हिजिटर्सची वाढती संख्या भारतीय बाजारपेठांसाठी होम कॅटेगरीमध्ये व्यवसाय करण्यासाठी एचजीएच इंडियाची उपयुक्तता सिद्ध करते. आज अग्रगण्य भारतीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्या घरगुती उत्पादनांसाठी भारतीय देशांतर्गत बाजारपेठ खुली करण्यासाठी एचजीएच इंडियाच्या भूमिकेची पोचपावती देतात.

घरगुती उत्पादने, होम डेकोर, हाऊसवेयर आणि गिफ्ट्स सर्व सेगमेंट्समधील एचजीएचची वाढती लोकप्रियता ह्या ट्रेड शोमधील प्रदर्शक आणि व्हिजिटर्सची वाढती संख्या प्रतिबिंबित करते.

एचजीएच इंडियाला भेट देणाऱ्या प्रदर्शकांची संख्या २०१२मधील १४० वरून वाढून ती २०१७मध्ये ५०० पर्यंत म्हणजे सुमारे ३५०% ने वाढलेली आहे. त्याचप्रमाणे, व्हिजिटर्सची संख्या २०१२मधील ६,१४० वरून वाढून ती २०१७मध्ये ३०,७०० पर्यंत म्हणजे सुमारे ५००% ने वाढलेली आहे. एचजीएच इंडिया ब्रँड्स आणि मॅन्युफॅक्चरर्सना संभाव्य भारतीय ट्रेड बायर्सशी जोडते, ज्यात किरकोळ विक्रेते, घाऊक विक्रेते, वितरक, आयात करणारे आणि संस्थात्मक खरेदीदार यांचा समावेश असतो.

सर्व प्रॉडक्ट कॅटेगरीमधील प्रदर्शकांनी सातत्याने उत्तम व्यवसाय झाल्याची माहिती दिलेली आहे. आंतरराष्ट्रीय आणि भारतातील प्रदर्शक यांना भारतीय बाजारपेठेतील त्यांचे अस्तित्व विस्तारण्यासाठी मोठी क्रयशक्ती असलेले खरेदीदार आणि दीर्घकालीन भागीदार सापडतात. ८०%पेक्षा अधिक प्रदर्शक आणि ९०% पेक्षा अधिक व्हिजिटर्स वर्षानुवर्षे एचजीएच इंडियाला भेट देत असतात, ज्यातून तिचे विक्रेते आणि खरेदीदार यांच्यासाठी असलेले महत्त्व प्रतिबिंबित होते.

# उदयोन्मुख भारतीय बाजारपेठेशी जोडते

भारत हा १.३ अब्ज लोकसंख्या असलेला देश आहे, ज्यातील सुमारे ६५% लोक ३० वर्षे वयाखालील, शिकलेले, शहरी भागात राहणारे आणि पर्यटन आणि माध्यमे यांच्यामाध्यमातून आंतरराष्ट्रीय जीवनशैलीशी उत्तमपणे जोडलेले आहेत. अर्थव्यवस्था दरवर्षी ७%पेक्षाही अधिक दराने वाढत आहे. अशा देशातील लोकसंख्येचा मोठा भाग हा सातत्याने प्रगती करणारा, उत्तम जीवनमानाची अपेक्षा ठेवणारा आहे. जीवनशैली उत्पादनांची वाढती मागणी हा त्याचा नैसर्गिक परिपाक आहे.

एचजीएच इंडियाच्या प्रत्येक पुढील आवृत्तीत भारतीय ग्राहकांच्या वाढत्या मागण्या पूर्ण सर्व संवर्गांमधील सुप्रसिद्ध भारतीय ब्रँड्स एकत्र भेटून संपूर्ण भारतातील त्यांच्या वितरकांशी व्यवहार करतात. ते प्रतिनिधित्व न मिळालेल्या प्रदेशातील नव्या व्यापाऱ्यांशी आणि वितरकांशीही जोडले जातात. आंतरराष्ट्रीय प्रदर्शक सुस्थापित तसेच इच्छुक वितरकांशी आणि ब्रँड प्रतिनिधींशी जोडले जातात, ज्यामुळे भारतातील बाजारपेठांमधील त्यांचे अस्तित्व विस्तारता येते.

नेमकी आकडेवारी सांगता येणे कठीण असले, तरी किरकोळ व्यापारी त्यांच्या नियमित पुरवठादारांकडे मोठ्या प्रमाणावर मागणी नोंदवीत असतात. अनेक प्रदर्शकांना संघटित किरकोळ साखळी दुकानांकडून आणि प्रतिष्ठित स्पेशॅलिटी स्टोअर्सकडून ट्रायल ऑर्डर्स मिळतात. नवीन



*तरुण इच्छुक भारतीय ग्राहक ब्रँडेड, लाइफस्टाईल उत्पादने पसंत करतात.*

करणाऱ्या उत्पादनांसाठी किरकोळ व्यापाऱ्यांची पसंती दिसून येते. ते तरुण, शिक्षित आणि खरेदी करण्याची क्षमता असलेल्या ग्राहकांच्या पसंतीस उतरणाऱ्या उत्पादनांविषयी विचारतात. स्वस्त उत्पादनांपेक्षा प्रिमिअम आणि ब्रँडेड, किमतीवर आधारित उत्पादनांची मागणी वाढत आहे. हाय-एंड टेबलवेयर, ग्लासवेयर, कुकवेयर, स्टोअरेज, किचन टूल्स, स्टोअरेज, होम डेकोर ॲक्सेसरीज, वॉलपेपर्स, फर्निशिंग फॅब्रिक्स आणि होम टेक्स्टाईल प्रॉडक्ट्स देऊ करणाऱ्या आंतरराष्ट्रीय आणि भारतीय प्रदर्शकांना उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

स्टोअर्स सुरू करणाऱ्या उद्योजकांना त्यांच्या व्यापाराचे नियोजन करण्यासाठी आणि सर्व संवर्गांमध्ये सोर्सिंग करण्यासाठी एचजीएच इंडिया एक सोयीचा मंच वाटतो.

पहिल्यांदाच प्रदर्शनात उतरणारे राष्ट्रीय पातळीवरील बाजारपेठांशी तात्काळ जोडले जातात. एचजीएच इंडियाच्या व्यापारसदृश वातावरणात नवीन डिझाईन्स, प्रॉडक्ट इनोव्हेशन्स आणि प्रॉडक्ट आयडियाज् यांवर उत्तम संशोधन केले जाते.

# ३० देशांतील ब्रँड्सना भेटा

एचजीएच इंडिया २०१८मध्ये ट्रेड व्हिजिटर्स ३० देशांतील उत्पादनांचे मूल्यमापन करून सोर्स करतात. प्रदर्शित करण्यात आलेली सुमारे ३५% उत्पादने ही आंतरराष्ट्रीय ब्रँड्समधून आणि मॅन्युफॅक्चरर्सकडील असतील आणि त्यांचे प्रदर्शन एकतर ते स्वत:च थेट करतील किंवा त्यांच्या भारतीय भागीदारांच्या माध्यमातून करतील. भारताव्यतिरिक्त २९ देशांतील १८५ ब्रँड्स प्रदर्शनात सहभागी असतील. ३१५ भारतीय ब्रँड्स आणि मॅन्युफॅक्चरर्सही त्यांच्या अलीकडील उत्पादनांचे प्रदर्शन करतील.


मोन्नो सिरॅमिक्स


स्पेस कं. लि.


आयदिन ओरमे


आयएफआय डिझाईन्स


डीकेडब्ल्यू कं. लि.


आरसीआय क्रिस्टलवेअर


बर्गहॉफ

थेट उपस्थित असलेल्या अग्रगण्य आंतरराष्ट्रीय ब्रँड्सपैकी काही असतील कुकवेयर, किचनवेयर आणि टेबलवेयरसहित बर्गहॉफ (बेल्जिअम); क्रिस्टल ग्लासवेयरसह आरसीआर क्रिस्टलवेयर (इटली); डिनरवेयरसह कोरेल्ले (यूएसए); स्टोअरेज आणि बाथरूम अ‍ॅक्सेसरीज्सह इंटर डिझाईन (यूएसए); प्लॅस्टिक किचनवेयर, टेबलवेयर आणि हाऊसवेयर यांच्यासह डीकेडब्ल्यू (थायलंड); आपल्या फ्रिगोंडाज रोबोटिक क्लीनर्सच्या मालिकेसह फ्रिगोंडाज (कोरिया); फर्निशिंग फॅब्रिक्ससह आयएफआय (ग्रीस); आणि कुकवेयर, किचनवेयर आणि टेबलवेयरसह कोर्कमाझ (टर्की).

अनेक अग्रगण्य तुर्कीश निर्माते होम टेक्स्टाईल्स, होम डेकोर आणि हाऊसवेयरमधील संपूर्ण विस्तृत मालिकांचे प्रदर्शन करतील. यात कर्टन फॅब्रिक्स, शीअर्स, एंब्रॉयडरी आणि लेस कर्टन यांच्यासह आयदिन, टेबल लिनन आणि वॉलपेपर्स यांच्यासह ऑंकू ग्रुप, डेकोरेटिव्ह ग्लासवेयरसह डेकोर कॅम, प्लॅस्टिक हाऊसवेयरसह टिटिझ, युगुरलर, लुक्स प्लॅस्टिक्स, मिस कलेक्शन, सोलमाझेर, रेंगा, आणि आयर्निंग बोर्ड्स, क्लोथ्स ड्रायर्ससह डॉग्रुलर इत्यादी.

याव्यतिरिक्त, अनेक सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय निर्मातेसुद्धा त्यांची विस्तृत मालिका या प्रदर्शनात मांडतील. यातील काही अग्रगण्य नावांमध्ये सिरॅमिक आणि पोर्सेलेन डिनरवेयर आणि टेबलवेयरसह मोन्नो सिरॅमिक्स (बांग्लादेश); ब्लाईंड्ससह स्पेस कं. लि. (कोरिया); प्लॅस्टिक शू बॉक्सेस, स्मॉल आयटेम स्टोरेज बॉक्सेस आणि ऑर्गनायझर्ससह नाम नगाई (थायलंड); पीव्हीसी वॉलपेपरसह झेजियांग लुलियन डेकोरेशन मटेरिअल कं. (चीन); किचन स्टोरेज, फूड प्रोसेसर, किचन ग्रेटरसह शुआंग्मा प्लॅस्टिक मॅन्युफॅक्चरिंग इन्कॉ. (चीन); फर्निचर आणि फर्निशिंगसाठी सिंथेटिक लेदरसह हॉंगझाऊ जिडा न्यू मटेरिअल्स टेक्नॉलॉजी कं. (चीन); विविध प्रकारचे बेसिक, डिझायनर आणि फ्रॅग्रंट कँडल्सह शिजुयाझुंग हॉमिंग्लाये कं. (चीन); अ‍ॅक्रिलिक स्टोरेज आणि जार्ससह हुए अर्ल च्यांग इंटरप्राईज (तैवान); नट क्रॅकर्स, स्पाईस ग्रायंडर, कंटेनर्स, जार्ससह क्यू यू प्लॅस्टिक एंटरप्राईझ कं. (तैवान); रॅक्स, क्लोझेट्स, शू रॅक्स, हँगर्स, मल्टि-पर्पज ट्रॉलीसह लेई मिंग इंडस्ट्रिअल कं. (तैवान); डेकोरेटिव्ह आर्ट्स, मेटल, रोटेटिंग ग्लोब्स आणि विशेष तयार केलेले गिफ्ट आर्टिकल्स यांच्यासह मोव्हा इंटरनॅशनल कॉर्प. (तैवान) यांचा समावेश होतो.

अनेक आंतरराष्ट्रीय ब्रँड्सने आधीच भारतीय भागीदार केलेले आहेत, जे त्यांची उत्पादने आयात करून त्यांचे येथे वितरण करतात. नाटमन (जर्मनी), नोरिटेक (जपान), फॉरेस्ट (नेदरलँड), बर्गनर (ऑस्ट्रिया), कव्हर्र (लुक्सेंबर्ग), बोर्गोनोव्हो अँड बॉरमिऑली रोक्को (इटली), ट्रुडेऊ (कॅनडा), किलनर (यूके) झिम्मर + रोहडे (जर्मनी) यांसारखे ब्रँड्स.

# तुर्की घेऊन येत आहे विस्तृत मालिका



डेकोर कॅम


टिटिझ प्लॅस्टिक


कोर्कमाझ


सोलमाझेर


लुक्स प्लॅस्टिक


आयदिन ओरमे


डॉग्रुलर


ऑंकू ग्रुप

विश्वासार्ह आणि उच्च दर्जाची उत्पादने सातत्याने उपलब्ध करून देण्याच्या बाबतीत तुर्कीने जागतिक कीर्ती संपादन केलेली आहे. तुर्कीश उत्पादने ही बाजारात उपलब्ध असलेल्या उत्पादनांपैकी सर्वात स्वस्त उत्पादने नसली, तरी भारतीय आयात करणाऱ्यांना त्यांची उच्च गुणवत्ता, नावीन्यपूर्ण डिझाईन्स आणि पैशाचा मिळणारा पुरेपूर मोबदला मिळतो हे समजून येत आहे. ती भारतीय ग्राहकांमध्ये अधिकाधिक लोकप्रिय होत आहेत ह्याचे आश्चर्य वाटायला नको.

तुर्की आपली हाऊसवेयर उत्पादने घेऊन हॉल ३मध्ये आणि होम डेकोर रेंज घेऊन हॉल २मध्ये ईव्हीएसआयडी ह्या तुर्कीश हाऊसवेयर्स मॅन्युफॅक्चरर्स अँड एक्सपोर्ट असोसिएशनच्या माध्यमातून उपस्थित असेल. गेल्या वर्षाच्या सकारात्मक व्यावसायिक निष्कर्षांमुळे मोठ्या तुर्कीश सहभागींना एचजीएच इंडिया २०१८ कडे आकर्षित केलेले आहे. प्लॅस्टिक किचनवेयर आणि बाथरूम अ‍ॅक्सेसरीज यांच्यासह लक्स प्लॅस्टिक, स्टोरेज आणि किचनवेयर यांच्यासह टिटिझ प्लॅस्टिक, किचन स्टोरेज, युटेन्सिल्स आणि रॅक्स यांच्यासह मिस कलेक्शन, बाथरूम इसेन्शिअल्स आणि डस्टबिन्स यांच्यासह उगुर्लर प्लॅस्टिक हे मोठ्या जागांमध्ये प्रदर्शन मांडतील.

अनेक तुर्कीश प्रदर्शक पहिल्यांदाच त्यांची उत्पादने प्रदर्शनात मांडतील. त्यांच्यापैकी ईव्हीएसआयडीच्या माध्यमातून जे प्रदर्शन मांडणार आहेत त्यांच्यात ऑईल डिस्पेन्सर्स, बॉटल्स, टेबल बाऊल्स, सॉल्ट अँड पिपर डिस्पेन्सर्स, ब्रेड बॉक्सेस इत्यादींसारख्या अ‍ॅक्रिलिक आणि ग्लास बेस्ड टेबलवेयरसह सोलमॅझेर, प्लॅस्टिक आणि ग्लास बेस्ड किचन स्टोरेज, किचन युटिलिटिज् आणि टेबलवेयरसह रेंगा, डेकोरेटिव्ह फर्निशिंगसह आयदिन; डेकोरेटिव्ह ग्लासवेयरसह डेकोर कॅम; टेबल लिनेनसह ऑंकू; आणि किचन ऑर्गनायझर्स, बेबी हॅमॉक्स, आयर्न बोर्ड्स, होम अप्लायन्सेस इत्यादींसह डॉग्रुलर हे एचजीएच इंडिया २०१८मध्ये सहभागी होतील, ज्यामुळे भारतीय किरकोळ व्यापारी आणि आयात करणारे यांच्यासाठी सोर्सिंग अजूनच उत्कंठावर्धक होईल.

कोर्कमाझ हा सुप्रसिद्ध तुर्कीश ब्रँड त्यांची कुकवेयर, किचनवेयर आणि टेबलवेयरची मालिका थेट आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रदर्शित करील.

# सर्व व्हिजिटर्सना नोंदणीसाठी प्रत्यक्ष जागेवर पैसे भरावेच लागतील

ह्या आवृत्तीपासून व्यवसायाशी संबंधित नसलेल्या व्हिजिटर्सना आळा घालण्यासाठी आणि खऱ्याखुऱ्या व्हिजिटर्सचा वेळ आणि प्रयत्न वाचावेत म्हणून एचजीएच इंडियाने व्हिजिटर्ससाठी मोफत प्रवेशासाठी व्हिजिटर्सच्या नोंदणीची प्रणाली संपूर्णपणे ऑनलाईनवर सुरू केलेली आहे. ह्या वर्षापासून व्हिजिटर्सकडे प्रदर्शकांकडील किंवा आयोजकांकडील अधिकृत निमंत्रणपत्रिका असली, तरीही त्यांना कार्यक्रमाच्या ठिकाणी मोफत नोंदणी करता येणार नाही. ह्या पत्रिकांमध्ये स्पष्टपणे उल्लेख केल्यानुसार, मोफत प्रवेशासाठी व्हिजिटर्सनी १५ जून २०१८ पूर्वी ऑनलाईन पूर्वनोंदणी करणे अनिवार्य आहे.

होम टेक्स्टाईल्स, होम डेकोर, हाऊसवेयर आणि गिफ्ट्स सेक्टर्सशी संबंधित किरकोळ व्यापारी, घाऊक व्यापारी, वितरक, आयातदार, ट्रेडर्स, ब्रँड्स, मॅन्युफॅक्चरर्स, इन्स्टिट्यूशनल बायर्स, डिझायनर्स, आर्किटेक्ट्स, बाईंग ऑफिसेस आणि प्रोफेशनल्स हे ट्रेड शोमध्ये मोफत प्रवेश मिळविण्यास पात्र आहेत. यासाठी त्यांनी व्हिजिटर म्हणून १५ जून २०१८ पूर्वी एचजीएच इंडियाच्या www.hghindia.com ह्या संकेतस्थळावर पूर्वनोंदणी केलीच पाहिजे. त्यांनी व्हिजिटर्स रजिस्ट्रेशनवर क्लिक करून संकेतस्थळावर दिलेल्या स्टेप्सचे पालन करावे. कोणत्याही प्रकारची अडचण असल्यास त्यांनी visitors@hghindia.com वर ई–मेल पाठवावा किंवा श्री. अमर शर्मा यांच्याशी दूरध्वनी क्र. +९१ (२२) २४२१ ४१११ वर किंवा मोबाईल क्र.: +९१ ९३ २१४ ७५८८२ वर संपर्क साधावा.

पूर्वनोंदणी केलेल्या सर्व व्हिजिटर्सनी एचजीएच इंडियाच्या प्रीरजिस्टर्ड व्हिजिटर्स डेस्ककडे जाऊन त्यांचा क्यूआर कोड स्कॅन करून किंवा एचजीएच इंडियाच्या कार्यालयाकडून एसएमएस किंवा ईमेलवर प्राप्त झालेला संदर्भ क्रमांक नोंदवून त्यांचे प्रवेशपत्र मोफत छापून घ्यावे.

पूर्वनोंदणीशिवाय थेट कार्यक्रमस्थळी आलेल्या इतर व्हिजिटर्सना जागेवर प्रति व्हिजिटर रु.१,०००/– व्हिजिटर नोंदणी शुल्क भरावे लागेल, जे रोख रक्कम, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड किंवा पेटीएम यांच्या माध्यमातून भरता येईल.

## ट्रेड व्हिजिटर्स!

## १५ जून, २०१८ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करा आणि रु.१,०००/– प्रवेश शुल्क वाचवा

एचजीएच इंडिया २०१८ चे आयोजन ३–५, २०१८ रोजी मुंबईत होणार आहे. २०१८/१९ साठी पूर्वानुमानिक फॅशन व लाईफस्टाईल ट्रेंड ने प्रेरित ५५० हून जास्त ब्रँड्स आणि निर्मात्यांच्या नाविन्यपूर्ण, उच्च गुणवत्तेच्या उत्पादनांवर एक नजर टाका. आपल्या प्रतिस्पर्धींच्या आधी ते मिळवा.




**होम डेकोर** सिलिंग, वॉल्स, विंडोज्, फ्लोअर, डेकोरेटिव्ह ॲक्सेसरीज, लाईफस्टाईल्स **होम टेक्स्टाईल्स** स्लीपिंग, बाथ, टेबल ॲंड किचन, लिव्हिंग, फ्लोअर्स, फर्निशिंग, डेकोर. **गिफ्ट्स** कॉर्पोरेट, पर्सनल, फेस्टिव्ह. **हाऊसवेयर** कुकवेयर, किचन अप्लायन्सेस, टेबलवेयर, बाथरूम, मेंटेनन्स, क्लिनिंग, स्टोरेज, आऊटडोअर.

### एक्सक्लुझिव्ह बेनिफिट्सचा लाभ घ्या.

- एचजीएच इंडियामध्ये मोफत प्रवेश मिळवा.
- पूर्वनोंदणी केलेले व्हिजिटर म्हणून तुमचा बॅज घेण्यावरील तुमचा वेळ वाचवा. तुमच्या ऑनलाईन नोंदणीनंतर तुम्हाला पाठविण्यात आलेल्या क्यूआर कोडच्या साह्याने तुम्ही तुमचा बॅज थेट प्रिंट करू शकता.
- एचजीएच इंडिया २०१८ची एक मोफत प्रत
- खऱ्याखुऱ्या व्हिजिटर्सच्या वापरासाठी एचजीएच इंडियाच्या कॉम्प्लिमेंटरी हॉट लाऊंज, पॉप कॉर्न लाऊंज आणि शटल बस सर्व्हिस आणि इतर सुविधांचा वापर.

*हे फायदे मिळविण्यासाठी आणि प्रत्यक्ष जागेवरील नोंदणी शुल्क वाचविण्यासाठी तुम्ही आमच्या www.hghindia.com ह्या संकेतस्थळावर १५ जून २०१८ पूर्वी ऑनलाईन नोंदणी केलीच पाहिजे.*

### मोफत व्हिजिटर्स नोंदणी मार्गदर्शक सूचना

- www.hghindia.com वर ऑनलाईन पूर्वनोंदणी केलेल्या खऱ्याखुऱ्या व्हिजिटर्ससाठीच मोफत व्हिजिटर प्रवेश.
- जर आधीच नोंदणी केलेली नसेल, तर ट्रेड शोच्या ठिकाणी आमंत्रित केलेले ट्रेड व्हिजिटर्ससुद्धा मोफत स्पॉट रजिस्ट्रेशनसाठी पात्र नाहीएत.
- ऑनलाईन नोंदणी न केलेल्या सर्व व्हिजिटर्सना ट्रेड शोमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी १,००० रुपये स्पॉट रजिस्ट्रेशन फी भरावी लागेल.
- ऑनलाईन व्हिजिटर नोंदणीची शेवटची तारीख: **१५ जून २०१८**.

### मोफत प्रवेशासाठी टप्पे

१. आमच्या संकेतस्थळाला भेट द्या **www.hghindia.com**
२. होम पेजवर ''व्हिजिटर रजिस्ट्रेशन''वर क्लिक करा.
३. ऑनलाईन व्हिजिटर रजिस्ट्रेशन फॉर्म पूर्ण करा.
४. तुमचा व्हिजिटर रजिस्ट्रेशन क्र. आणि क्यूआर कोड ई–मेल आणि एसएमएसद्वारे प्राप्त करा, ज्यामुळे तुमच्या नोंदणीची पुष्टी होते.
५. तुमच्या मोबाईलवर किंवा छापलेल्या स्वरूपात तुमचा नोंदणी क्र. किंवा क्यूआर कोड सोबत घेऊन जा.
६. तुमचा बॅज प्रिंट करण्यासाठी एचजीएच इंडिया २०१८ च्या हॉल १ किंवा हॉल ३ मध्ये तुमचा नोंदणी क्र. सादर करा किंवा क्यूआर कोड स्कॅन करा.

### महत्त्वाच्या नोंदी

१) एंट्री बॅज हा एचजीएच इंडियामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी तुमचा वैयक्तिक हक्क आहे आणि तो पूर्णत: अहस्तांतरणीय आहे.
२) तुम्ही जर अगोदरच्या वर्षी एचजीएच इंडियाकडे आधीच नोंदणीकृत व्हिजिटर असलात, तर कृपया ऑर्गनायझर्सकडून तुमचा संदर्भ क्र. शोधून घ्या आणि एचजीएच इंडिया २०१८ साठी ऑनलाईन नोंदणीचे नूतनीकरण करण्यासाठी त्याचा वापर करा.
३) एचजीएच इंडिया २०१८मध्ये मोफत प्रवेशासाठी मागील वर्षाच्या व्हिजिटर्ससाठी नोंदणीचे नूतनीकरण आवश्यक आहे. जर नूतनीकरण केले नाही, तर १,०००/– रुपये स्पॉट रजिस्ट्रेशन फी देय असेल.
४) एचजीएच इंडिया हा फक्त ट्रेड शो आहे. म्हणून ग्राहकांना प्रवेश करण्यास परवानगी नाही. किरकोळ खरेदीस परवानगी नाही. तुम्ही जर किरकोळ खरेदी करताना आढळलात, तर तुम्हाला व्हिजिटर म्हणून अपात्र ठरविण्यात येईल.
५) १५ वर्षांखालील मुलांना प्रवेश नाही.
६) कोणत्याही व्हिजिटरला प्रवेश नाकारण्याचा विवेकाधिकार आयोजक राखून ठेवीत आहेत.

**पुढील माहिती आणि साहाय्यासाठी कृपया संपर्क साधा**

दूरध्वनी, मुंबई: +९१ २२ २४२१ ४१११, फॅक्स: +९१ (२२) २४२१ ४११६ दिल्ली: +९१ ११ २५७१ ४१११, फॅक्स: +९१ (११) २५७१ ४११६.
अमर शर्मा मोबाईल +९१ ९९ ६७६ ००२८६ / निकेत सेकसारिया मोबाईल: +९१ ९९ ३०१ ७२९७३ ई–मेल: visitors@hghindia.com